01 MAY 2026

तरुण भारत

# पदवी, पदव्युत्तरच्या ४० अभ्यासक्रमाचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मार्च, एप्रिल २०२६ उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर परीक्षेतील गुरुवारी १० अभ्यासक्रमाचे निकाल जाहीर झाले असून आजअखेर ४० अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आलेले आहेत. विविध ११२ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पध्दतीने २०३ परीक्षा केंद्रावर पार पडल्या असून सदर परीक्षांसाठी ५१ हजार ७२२ विद्यार्थी उपस्थित होते. परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. सदर पथकाकडून कोल्हापूर ५, सांगली २ सात गैरप्रकाराची प्रत्यक्ष नोंद परीक्षा प्रमाद समितीमार्फत करण्यात आलेली आहे. सातारा जिल्ह्यातून कोणत्याही गैरप्रकाराची नोंद परीक्षा प्रमाद समितीतर्फे करण्यात आली नाही. परीक्षेसाठी विद्यापीठाने परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. तसेच परीक्षेचे पावित्र्य राखण्यासाठी विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनाप्रमाणेच परीक्षा द्यावी, असे आवाहन संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांनी केले आहे.

0 1 MAY 2026

जनप्रवास

# विद्यापीठाच्या ४० अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

**जनप्रवास : कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठाच्या विविध ११३ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पध्दतीने २०३ परीक्षा केंद्रावर सुरळीतपणे पार पडल्या. या परीक्षांसाठी ५१ हजार ७२२ विद्यार्थी उपस्थित होते. गुरुवारी ३० रोजी विविध१० अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले.

आजअखेर ४० अभ्यासक्रमांचे निकाल जाहिर करण्यात आलेले आहेत. परीक्षेदरम्यान ३० एप्रिल रोजी कोल्हापूर - ५, सांगली- २ सात गैरप्रकाराची प्रत्यक्ष नोंद परीक्षा प्रमाद समितीमार्फत करण्यात आली.

01 MAY 2026

लोकमत

# शिवाजी विद्यापीठात तुकडोजी महाराज जयंती

कोल्हापूर : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची जयंती गुरुवारी शिवाजी विद्यापीठात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीत सकाळी प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव आणि कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे यांच्या हस्ते राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी आजीवन अध्ययन व विस्तार कार्य अधिविभागप्रमुख डॉ. रामचंद्र पवार, हिंदी अधिविभागप्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी, डॉ. जयसिंग कांबळे, डॉ. संतोष कोळेकर, डॉ. प्रकाश मुंज, डॉ. अनिल मकर, डॉ. सुषमा मांडेकर, हेमंत जाधव, निकिता पाटील आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष

01 MAY 2026 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जल व्यवस्थापन ही काळाची गरज : डॉ. राऊत

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

जागतिक तापमान हा विषय अतिशय चिंताजनक विषय असून, याबाबत अतिशय गांभीर्याने नियोजन करणे गरजेचे आहे. पर्यावरणातील वाढते बदल लक्षात घेता जल व्यवस्थापनाची अत्यंत आवश्यकता आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे पर्यावरणशास्त्र विभागाचे माजी विभागप्रमुख प्रा. डॉ. पी. डी. राऊत यांनी केले.

जलसंपदा विभागातर्फे जिल्हाधिकारी कार्यालयातील ताराराणी सभागृहात आयोजित पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जल व्यवस्थापन कृती पंधरवडा समारोप प्रसंगी वातावरणातील बदल आणि कार्बन संचयन या विषयावर ते बोलत होते.

डॉ. राऊत म्हणाले, वृक्ष लागवडीला प्राधान्य देणे व हवामानातील बदल समजून घेणे आवश्यक आहे. 'स्त्री कालची, आजची आणि उद्याची' या विषयावर यशस्वी महिला सबलीकरण फाऊंडेशन भुयेवाडीच्या संस्थापक अध्यक्षा राणी पाटील म्हणाल्या, स्त्रीला समाजाने सर्वत्र सन्मानाची वागणूक द्यावी. दुर्दैवाने हल्ली कुटुंब व्यवस्थेत कमतरता जाणवत आहे. हे चित्र बदलायला हवे. स्त्रीमध्ये सर्वाधिक क्षमता असल्याने ती सर्व पातळीवर यशस्वी झाली आहे.

या पंधरवड्याच्या अनुषंगाने जल प्रतिज्ञा घेण्यात आली. यावेळी अधीक्षक अभियंता म्हेत्रे यांनी जलसंपदा विभागाने राबविलेल्या उपक्रमांची माहिती दिली. उपजिल्हाधिकारी शक्ती कदम व प्रसाद संकपाळ यांची भाषणे झाली. यावेळी जल कृतिपंधरवड्यात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अभियंत्यांचा, प्रमाणपत्र व गुलाब पुष्प देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी कार्यकारी अभियंता पूनम माने, अशोक पवार उपस्थित होते. सूत्रसंचालन पंडित कंदले यांनी केले. प्रास्ताविक डी. डी. शिंदे यांनी केले. एस. आर. पाटील यांनी आभार मानले.

01 MAY 2026

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


**शैक्षणिक** पदव्युत्तर पदवी पूर्ण करण्याआधीच विद्यार्थ्यांना संधी : शिवाजी विद्यापीठात २०२३ पासून अभ्यासक्रम सुरू

# 'जिओइन्फॉर्मेटिक्स'च्या विद्यार्थ्यांची नामांकित कंपन्यात निवड

**प्रतिनिधी, कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठातील भूगोल अधिविभागांतर्गत चालणाऱ्या 'एम.एस्सी. जिओइन्फॉरमॅटिक्स" अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांची नामांकित राष्ट्रीय व बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये झाली आहे. शिवाजी विद्यापीठात २०२३ पासून हा विशेष अभ्यासक्रमाचा कोर्स सुरू झाला असुन या विद्यार्थ्यांनी पदव्युत्तर पदवी पूर्ण करण्यापूर्वीच स्थान प्राप्त केल्याने शिवाजी विद्यापीठाचा नाव लौकिक झाला आहे.

या प्लेसमेंट मोहिमेअंतर्गत निवड झालेल्या विद्यार्थ्यांना देशातील विविध महत्त्वाच्या शहरांमध्ये काम करण्याची संधी मिळणार आहे. या सर्व विद्यार्थ्यांनी आपली अंतिम सत्राची परीक्षा नुकतीच दिली असून, परीक्षेचा निकाल जाहीर होण्यापूर्वीच त्यांना नामांकित कंपन्यांकडून नियुक्ती पत्रे मिळाली आहेत. अधिविभागाने दिलेले तांत्रिक कौशल्ये व दर्जेदार प्रशिक्षणाचे हे फलित ठरले असल्याचे अधिविभागाचे प्रमुख डॉ. सचिन पन्हाळकर यांनी सांगितले.



**कोल्हापूर : जिओइन्फॉर्मेटिक्सच्या विद्यार्थ्यांसमवेत डॉ. सचिन पन्हाळकर, डॉ. अभिजित पाटील, डॉ. पी. टी. पाटील, डॉ. व्ही. ए. चौगुले, डॉ. सुधीर पवार आणि शुभम गिरीगोसावी आदी.**

डॉ. पन्हाळकर म्हणाले, आजच्या युगात जिओ-स्पेशियल डेटा, ड्रोन तंत्रज्ञान व रिमोट सेन्सिंग या क्षेत्रांची वाढती मागणी लक्षात घेऊनच हा अभ्यासक्रम तयार केला आहे.

विद्यार्थ्यांना विभागप्रमुख डॉ. पन्हाळकर, डॉ. अभिजित पाटील, डॉ. पी. टी. पाटील, डॉ. व्ही. ए. चौगुले, डॉ. सुधीर पवार आणि शुभम गिरीगोसावी यांचे मार्गदर्शन लाभले.

**निवड झालेले विद्यार्थी असे**

श्रद्धा नाईकबा यादव (स्कायलार्क ड्रोन्स कंपनी, बंगळुरू) निकिता राजेंद्र जाधव (आयमेरिट टेक्नॉलॉजी, पुणे), शेखर मुत्तप्पा कांबळे (अर्थयार्ड इन्फोटेक, राजस्थान), शुभम रामचंद्र पाटील जिओ-इन्फो सर्व्हिसेस, नवी मुंबई), मोहिनी राजाराम सुतार (ॲटलास जिओग्राफिक डेटा प्रा. लि., पुणे) निर्मिती वैभव दुरे (एल.ई.ए. असोसिएट्स साउथ एशिया प्रा. लि., मुंबई), राहुल गोसावी (टेरा इन्फॉर्मेटिक सर्व्हिसेस, पुणे).

**प्रवेश प्रक्रिया सुरू**

**एम.एस्सी. जिओइन्फॉरमॅटिक्स अभ्यासक्रमासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असून ड्रोन सर्वेक्षण, नकाशाशास्त्र, जीआयएस आणि रिमोट सेन्सिंग यांसारख्या आधुनिक विषयात रस असलेल्या विद्यार्थ्यांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. पन्हाळकर यांनी केले आहे.**

01 MAY 2026

जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पर्यावरणातील बदल लक्षात घेता जलव्यवस्थापन आवश्यक

## प्रा. डॉ. पी. डी. राऊत : जल कृतीपंधरवड्यात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अभियंत्यांचा प्रमाणपत्र देऊन सत्कार

**जनप्रवास : कोल्हापूर**

जागतिक तापमान हा विषय अतिशय चिंताजनक विषय आहे. अद्याप अजूनही वेळ गेलेली नाही. यावर अतिशय गांभीर्यपूर्वक नियोजन करणे गरजेचे आहे. पर्यावरणातील वाढते बदल लक्षात घेता जल व्यवस्थापनाची अत्यंत आवश्यकता असल्याचे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे पर्यावरण शास्त्र विभागाचे माजी विभाग प्रमुख प्रा. डॉ. पी. डी. राऊत यांनी केले.

जलसंपदा विभागाकडून जिल्हाधिकारी कार्यालयातील ताराराणी सभागृहात आयोजित पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जल व्यवस्थापन कृती पंधरवडानिमित्त कार्यशाळा, महिला मेळावा व समारोप प्रसंगी आयोजित केलेल्या वातावरणातील बदल आणि कार्बन संचयन या विषयावर ते बोलत होते.

व्यासपीठावर रोहयो उपजिल्हाधिकारी शक्ती कदम, जलसंपदाचे अधीक्षक अभियंता अभिजित म्हेत्रे, उप अधीक्षक



अभियंता संजय पाटील, कार्य अभियंता स्मिता माने, देवाप्पा शिंदे, अशोक पवार गुण नियंत्रक उप अभियंता पुनम माने, व्याख्यात्या राणी पाटील, प्रसाद संकपाळ आदी उपस्थित होते.

ते म्हणाले, वृक्ष लागवडीला प्राधान्य देणे व हवामानातील बदल समजून घेणे आवश्यक आहे. प्रारंभी या पंधरवड्याच्या अनुषंगाने जल प्रतिज्ञा घेण्यात आली. यावेळी अधीक्षक म्हेत्रे यांनी कृती पंधरवडा आयोजनाचा आढावा घेऊन, जलसंपदा विभागाकडून राबविलेल्या विविध उपक्रमांची माहिती उपस्थितांना दिली. यावेळी उपजिल्हाधिकारी शक्ती कदम व प्रसाद संकपाळ यांनीही या जल - व्यवस्थापन कृती पंधरवड्याच्या अनुषंगाने आपले विचार व्यक्त केले.

जल स्तोत्राचे संवर्धन पाणी बचतीचे महत्त्व जनतेपर्यंत पोहोचवणे आणि जल व्यवस्थापनाबाबत जनतेमध्ये जनजागृती करणे या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डी. डी. शिंदे यांनी तर आभार प्रदर्शन एस. आर. पाटील यांनी केले. यावेळी जल कृतीपंधरवड्यात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अभियंत्यांचा, प्रमाणपत्र व गुलाब पुष्प देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार केला. सूत्रसंचालन पंडित कंदले यांनी केले. या कार्यक्रमासाठी जलसंपदा विभागाचे इतर अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

### 'तिला' सन्मान द्या : राणी पाटील

स्त्री कालची आजची आणि उद्याची या विषयावर यशस्वी महिला सबलीकरण फाउंडेशन भुयेवाडीच्या संस्थापक अध्यक्ष राणी पाटील म्हणाल्या, स्त्रीला समाजाने सर्वत्र सन्मानाची वागणूक द्यावी. दुर्दैवाने हल्ली कुटुंब व्यवस्थेत कमतरता जाणवत आहे, हे चित्र बदलायला हवे. स्त्रीमध्ये सर्वाधिक क्षमता असल्याने ती सर्व पातळीवर यशस्वी झाल्याचे सांगून 'तिला' सन्मान देण्याचे आवाहन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

01 MAY 2020 जनप्रवास




# विद्यापीठात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची जयंती

## प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या हस्ते प्रतिमेस अभिवादन

**जनप्रवास : कोल्हापूर**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची जयंती विद्यापीठात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये गुरुवारी सकाळी प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव आणि कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या हस्ते राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले.

यावेळी आजीवन अध्ययन व विस्तार कार्य अधिविभागप्रमुख डॉ. रामचंद्र पवार, हिंदी अधिविभागप्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी, डॉ. जयसिंग कांबळे, डॉ. संतोष कोळेकर, डॉ. प्रकाश मुंज, डॉ. अनिल मकर, डॉ. सुषमा मांडेकर, हेमंत जाधव, निकिता पाटील, पल्लवी वालेकर, अविनाश कांबळे, आनंदराव बेडगे, श्रीकांत देसाई, सुप्रिया पवार यांचेसह शिक्षक, विद्यार्थी, विद्यार्थीनी उपस्थित होत्या. यावेळी उपस्थित मान्यवरांनी तुकडोजी महाराज यांच्या कार्याविषयी माहिती दिली.